नि.दि.दा. क्र. ६४/२०१९
करुणा वि. सखाराम व ईतर
CNR No.MHWS080007482019

## निशाणी क्र. २४ खाली आदेश
## (पारित दिनांक १२.०१.२०२४)

प्रतिवादी क्र. ०२ ने सदरचा अर्ज नि.क्र. १७ खाली झालेल्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी केला असुन त्याच्या कथनानुसार तो न्यायालयात हजर असून प्रकरण चालविण्यास आणि खर्चाची पुर्तता करण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होवुन नि.क्र. १७ ची पुर्तता करण्याची परवागनी त्याने मागितली आहे. याउलट वादीचे वकील हजर असून त्यांनी सदर अर्जावर केवळ ''Strongly opposed'' असा शेरा नोंदविला.

**०२** दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. प्रकरण २०१९ सालाचे असून वादीने सदरचा अर्ज दिनांक १६.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर तिन्ही प्रतिवादींना नि.क्र. ०९ ते ११ नुसार समन्स तामील झालेले होते. परंतू प्रतिवादी क्र. ०१ न्यायालयात हजर झाला होता. त्याला संधी देवूनही त्याने जबाब दावा दाखल न केल्याने त्याचेविरुध्द दिनांक २८.०१.२०२० रोजी माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी विना जबाब दावा आदेश पारीत केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हे हजर न झाल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत केला होता. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने नि.क्र.१४ नुसार लेखी जवाब दाखल करण्याचा अर्ज दाखल केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ०२ याने नि.क्र.१७ नुसार लेखी जवाब दाखल करण्याचा अर्ज दाखल केला होता सदर अर्ज खर्चासह मंजूर करण्यात आले होते.

**०३** परंतु नि.क्र.१४ आणि १७ ची पुर्तता करण्यात आलेली नसल्याने प्रतिवादींचे जवाब अभिलेखावर घेण्यात आले नव्हते. प्रतिवादी क्र.०१ ने नि.क्र.२० नुसार लेखी जवाब अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल करुन त्यावरील आदेशानुसार पुर्तता केली नाही. त्यामुळे नि.क्र.२० हा सुध्दा दिनांक २१.०६.२०२३ रोजी दाखल दप्तरी करण्यात आला. परंतु त्यानंतरही प्रकरणात नि.क्र.०५ वरील अर्ज प्रलंबित असतांना वादी आणि त्यांचे वकील सुध्दा गैरहजर होते. त्यामुळे प्रकरण खारीज आदेशाकरीता ठेवण्यात आले होते.

**०४** आजरोजी वादीचे वकील हजर असून त्यांनी नि.क्र.२३ खाली अर्ज दाखल केला आहे. त्यांनी नि.क्र.२२ वर दस्तऐवज दाखल केले आहे. आजरोजीच प्रतिवादी क्र.०२

स्वतःहून हजर झाला असून त्याने सुध्दा सदर अर्ज दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप व प्रतिवादींची सततची गैरहजेरी बघता सदरचा अर्ज नामंजूर करण्याजोगा आहे. परंतु वादींच्या वकीलांची हरकत नसल्याने प्रकरणात प्रतिवादीला एक शेवटची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आणि प्रकरणाचे स्वरुप व सद्यस्थिती बघता एक संधी देणे योग्य ठरेल. जेणे करुन प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होईल. वादीला झालेल्या त्रासाबद्दल प्रतिवादीवर अर्जाचा खर्च लावणे समर्पक वाटते. त्यामुळे सदर अर्ज नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.०२ चा अर्ज रु. २००/– (दोनशे रुपये केवळ) खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. दोन्ही पक्षांनी सदर प्रकरण तत्परतेने चालवावे.

स्वा/-

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १२.०१.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : H.A.Uchade (Stenographer L.G.)

Name of court : C.J.J.D.& JMFC;Risod

Date : 12.01.2024

Judgment/Order signed by the Presiding Officer : 12.01.2024

Judgment/Order uploaded on : 12.01.2024